# पोलीस आयुक्त,कार्यालय,औरंगाबाद शहर.

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर,औरंगाबाद शहर-४३१००१(महाराष्ट्र राज्य)

Mail Id :- pi.cybercell.abad@mhapolice.gov.in दुरध्वनी क्रमांक:-०२४०-२९७०३४१

---

दि.०४/०८/२०१७

## IDBI बँक फोडण्याच्या कटातील दरोडेखोर अटकेत

दि.०२/०८/२०१७-पुंडलीकनगर येथील IDBI बँकेवर दरोड्याचा प्रयत्न करणा-या टोळीतील मुख्य सुत्रधार याला अटक करण्यात आली आहे. बबलु प्रसाद रमेश प्रसाद वय-२३ वर्ष रा.उत्तराखंड असे आरोपीचे नाव आहे. २६ जुलै रोजी पुंडलीकनगर पोलीस गस्तीवर असताना पहाटे ०४.०० वा. सेव्हन हिल्स् येथे ४ जणांना अडविले होते, पोलीसांना पाहुन त्यातील तिघे जण पळुन गेले होते तर अमोल भालेराव याला पोलीसांनी अटक केली. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे दरोड्यासाड्डी लागणारी १६ हत्यारे आढळुन आली. त्याने चौकशी दरम्यान IDBI बँकवर दरोडा घालण्याच्या तयारीत असल्याचे कबुल केले होते. त्यानंतर रेल्वे स्टेशन भागातुन फरार आरोपींपैकी राजु अल्हाट व पिंपळगाव सुतार रा.भोकरदन येथुन समाधान लिंबाजी चिंचोले यास अटक करण्यात आती होती. तेव्हापासुन पोलीस उर्वरीत आरोपींच्या शोधात होते.

या गुन्हयातील मुख्य सुत्रधार बबलु प्रसाद हा गुन्हा झाल्यापासुन फरार होता व वेळोवेळी आपले राहण्याचे ठिकाण बदलत होता. सायबर गुन्हे शाखेकडुन मिळालेल्या तांत्रिक माहीतीच्या आधारे आरोपी हा पुणे येथे असल्याने पुंडलीकनबर पोलीस चौकीचे पोलीस उप-निरीक्षक रामचंद्र पवार व स्टाफ हे पुणे येथे जावुन सलग ११ तासाच्या सापळ्यानंतर आरोपीचा ५ किमी. पाठलाग करुन लोणीकंद पोलीस स्टेशन हद्दीतुन मोठ्या शिताफीने आरोपी बबलु प्रसाद यास ताब्यात घेण्यात आले असुन त्याच्याकडुन मालाविरुद्धचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. पो.नि.अशोक मुदीराज, पोउपनि रामचंद्र पवार, पोना/चैरे, पोकॉ/अत्तर, राजेश यदमल, संतोष पारदे, जालिंदर मान्ते, विलास डोईफोडे, यांनी कार्यवाही पार पाडली.



दि.०४/०८/२०१७

# चार्ली पथकाच्या सतर्क पेट्रोलिंग मुळे मारहाण करून लुटणारे दोन तासात गजाआड.

दि.03.08.2017- मध्यरात्री 1.30 वाजेच्या सुमारास 4 इसमांनी मोटार सायकल वर जाणाऱ्या दोघांना दौलताबाद घाटामध्ये मारहाण करून त्यांच्या कडून बळजबरीने 1000 रोख रु. व मोबाईल घेऊन मारुती कार सह औरंगाबाद शहरामध्ये पळाले व तात्काळ जिन्सी चार्ली-१ यांनी चौघा आरोपीतांना मारुती कारसह पकडले. रवींद्र सुरेंद्र फुलारे वय 25 वर्ष, रा. खुलताबाद, हे रात्री 1.30 वाजेच्या सुमारास मोटारसायकलने दौलताबादकडून खुलताबादकडे जात असताना दौलताबाद घाटामध्ये रवींद्र फुलारे यांची मोटार सायकल 4 इसमांनी अडवून त्यांना व त्यांचा मित्र यांना लाथा-बुक्क्याने व फायटरने मारहाण करून खिशातील रोख रक्कम 1000 रु, मोबाईल फोन घेऊन मारुती कारने औरंगाबाद शहराकडे पळून गेले. रवींद्र फुलारे यांनी तत्काळ दौलताबाद पोलीस ठाणे गाठून हि घटना दौलताबाद पोलिसांना सांगितली व दौलताबाद पोलिसांनी तात्काळ नियंत्रण कक्षास माहिती कळविली. नियंत्रण कक्षाने पूर्ण शहरामध्ये पेट्रोलिंग मोबाईल यांना माहिती देऊन शहरात नाकाबंदी केली व अवघ्या 2 तासाच्या आत जिन्सी चार्ली वरील पोलीस कर्मचारी अनिल कोमटवार व लखन खंदारे यांनी हि मारुती कारसह चौघांना जालना रोडवरील गुरुनानक पेट्रोलपंप येथे पकडले व दौलताबाद पोलिसांच्या ताब्यात दिले. या पकडलेल्या आरोपींची नावे अरबाज खान अझहर खान वय 21 वर्ष रा. कबाडीपुरा, नवीद सिद्धीकी अजीम सिद्धीकी वय 20 वर्ष रा. जुना बारूदनाला, सय्यद सरफोद्दिन सय्यद रियाजोद्दीन वय 21 वर्ष रा. जुना बाजार , शेख शारुख शेख हनीफ वय 24 वर्ष रा. मुर्गीनाला असे असून त्यांना दौलताबाद पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गु.र.न. 70/2017 कलम 394, 34 भा.द.वि. गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली असून चारही आरोपींनी गुन्ह्याची कबुली देऊन गुन्ह्यातील गेला माल रोख रक्कम 1000 रु. व 9000 रु. किंमतीचा मोबाईल व एक पितळी फायटर व गुन्ह्यात वापरलेली मारुती कार क्र. MH-20-H- 977 जप्त करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक व्ही.डी. वडणे पो. स्टे. दौलताबाद हे करीत आहे.


पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१
महाराष्ट्र पोलीस

दि.१३/०९/२०१६.

# “ चार्ली व जवाहरनगर पोलीस स्टेशन ची संयुक्त कामगिरी. ”

---ooo---

दि.२१/११/२०१६ रोजी जवाहर नगर पोलीस स्टेशन हद्दीत पोउपनि.आहेर व त्यांचे स्टाफ व चार्ली असे पेट्रोलींग करीत असताना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, सुतगिरणी चौक, गारखेडा येथील SBH बँकेच्या ATM समोर रोडवर मोटार सायकलवर ३ इसम बसलेले आहेत. व त्यांच्याकडे एक पांढरी गोणी असुन त्यामध्ये काहितरी संशयीत आहे अशी माहिती मिळाल्यावरुन पोउपनि.आहेर त्यांचा स्टाफ व चार्लीसह त्या ठिकाणी जावुन खात्री केली असता एका मोटार सायकलवर ३ इसम संशयास्पदरित्या दिसुन आल्याने त्यांना हटकले असता ते पळुन जावु लागल्याने मोटारसायकल स्वाराचा पाठलाग केला असता दोन इसम मोटार सायकल वरुन उडी मारुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेले. एका इसमास मोटार सायकल सह जागीच पकडले . त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शुभम विलास सोनवणे वय २० वर्षे रा.जयभवानी नगर असे सांगितले व त्याच्या ताब्यातुन एक गोणी मिळनु आली त्यात एक चाकु, टॅमी, रस्सी, मिरची पुड, फायटर असे मिळुन आले. व त्यास त्याचेसोबत असलेल्या व पळुन गेलेल्या दोन इसमांचे नाव विचारले असता त्यांने त्यांचे नाव १)शुभम भिकुलाल जाट वय २१ वर्षे रा.विनायक मेडीकल जवळ, शिवाजी नगर औरंगाबाद २)सचिन उत्तमराव कळसकर वय ३२ वर्षे रा.जयभवानीनगर औरंगाबाद असे सांगुन रात्री घरात घुसुन जबरी चोरी करण्याच्या उद्देशाने उल्कानगरी भागात आल्याची कबुली त्यांनी दिली असुन त्यांच्या विरुद्ध सरकार तर्फे पोहेकॉ/हिवाळे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे गु.र.नं.४२०/१६ कलम ३९८,४०१ भादवि सह कलम ४,२५ भा.ह.का प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपीतांकडुन घरफोडी सारखे गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे.

या कामगिरीची मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेशकुमार यांनी दखल घेवुन चार्लीचे कर्मचारी व पथकाचा सत्कार करुन २०,०००/-रु.पारितोषिक देण्यात आले.

सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेश कुमार, मा.पोलीस उप आयुक्त परीमंडळ-२ श्री.राहुल श्रीरामे, मा.सहा.पोलीस आयुक्त गुन्हे श्री.खुशालचंद बाहेती, सहा.पोलीस आयुक्त उस्मानपुरा श्री.बाखरे, पोलीस निरीक्षक गुन्हेशाखा श्री.मधुकर सावंत, पोनि.श्री.कल्याणकर, जवाहरनगर पो.स्टे, सपोनि.गजानन कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोउपनि.आहेर, पोहे/फारुक देशमुख, माणिक हिवाळे, पोकॉ/पांडुरंग तुपे, नेमणुक जवाहर नगर पोलीस स्टेशन व पोकॉ/संदिप देशमुख, विनोद गायकवाड, प्रविण बळीराम, राजेंद्र बडे सर्व नेमणुक चार्ली यांनी केली.

# दरोडा टाकण्याच्या तयारीत असणारे इसम गुन्हे शाखा पोलीसांच्या जाळयात पिस्टल, काडतुस, घातक शस्त्रासह अटक.

----ooo----

*दि.३०.०७.२०१६ रोजी गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारांकडून खात्रिलायक माहिती मिळाली की, बीड बाय पास रोडच्या बाजुला गुरु लॉन्स जवळ अंधारात काही इसम एकत्रीत जमलेले असून ते काहीतरी मोठा गुन्हा करण्याचे तयारीत आहे अशी माहिती मिळताच त्यानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.मधुकर सावंत यांनी मा.वरिष्ठांचे सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकासह तात्काळ ०१.०० वाजता गुरु लॉन्स जवळ पोहोचून सदर भागात त्या इसमांचा शोध घेतला असता गुरु लॉन्स बाजुला एशियाड कॉलनी जवळ एका कंपाऊंड च्या भिंतीलगत अंधारामध्ये झुडपांच्या आडोशाला सात इसम घातक शस्त्रांसह असल्याची खात्रीलायक बातमीवरुन सदर ठिकाणास चारही बाजुने घेरुन त्या झुडूपाचे बाजुला टॉर्च मारला असता आरोपीतांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला त्यांना पाठलाग करुन एकुण पाच आरोपींना ताब्यात घेतले. दोन आरोपी अंधाराचा फायदा घेवुन पळून जाण्यात यशस्वी झाले. त्यांची नावे निष्पन्न करुन शोध घेण्यात येत आहे.*

*ताब्यात घेतलेल्या इसमांची झडती घेतली असता एक पिस्टल, मॅगझीन तीन जिवंत काडतुसे (बुलेट), लोखंडी रॉड, लोखंडी धारदार कोयता, सुती दोरी व मिरची पावडर असे दरोडयाचे साहीत्य मिळून आले. त्यांची नावे १) गोविंद पन्नू शिंदे वय २२ वर्ष रा.राजनगर, मुकूंदवाडी औरंगाबाद २) विश्वकांत रमाकांत खरे वय २० वर्ष रा.हायकोर्ट कॉलनी,रिक्षा स्टॅन्डजवळ सातारा परिसर औरंगाबाद ३) अजय गमतीदास काळे वय १९ वर्ष रा.राजनगर, मुकूंदवाडी औरंगाबाद ४) तडीपार इसम - किसन राजू उमप ऊर्फ न्याबू वय २५ वर्षे रा.छोटा मुरलीधरनगर, उस्मानपुरा औरंगाबाद ५) वनेश पन्नू शिंदे वय-२७ वर्षे रा.रेल्वेस्टेशन जवळ, राजीवनगर, औरंगाबाद अशी आहेत.*

*सदरचे इसम हे घातक शस्त्र साहित्यानिशी बीड बाय पास रोड परिसरात कोठेतरी दरोडा टाकण्याच्या तयारीत असतांना मिळून आल्याने त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे मुकूंदवाडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आलेली आहे.*

*सदरची कामगीरी मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेश कुमार, पोलीस उप आयुक्त मुख्यालय श्री.संदीप आटोळे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. खुशालचंद बाहेती, यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.मधुकर सावंत, पोलीस उप निरीक्षक विजय जाधव, ASI नसीमखान, पोना/विजयानंद गवळी, पोकॉ/प्रदीप शिंदे, विशाल सोनवणे, रविंद्र दाभाडे, भावलाल चव्हाण, चालक पोहेकॉ/एजाज खान यांनी बजावली आहे. सदर कामगिरीची दखल घेऊन मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेशकुमार यांनी पो.नि.मधुकर सावंत, पोउपनि श्री. प्रशांत आवारे साहेब व त्यांचा टिमचा सत्कार करण्यात आला.*

# दरोडा करण्याचे तयारीत असणारे आरोपी गुन्हे शाखे कडुन अटकेत.

----ooo----

*दिनांक २०/०७/२०१६ रोजी २१.३० वाजता गुन्हे शाखेला गुप्त बातमीदाराने खात्रीशिर माहिती दिली की, औरंगाबाद शहर आयुक्तालय हद्दीत इसारवाडी फाटा येथे काही इसम हे दरोडा टाकण्याचे इराद्याने अंधारात एकत्र आले आहेत. मिळालेल्या माहिती वरून पो. नि. मधुकर सावंत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक वाघ हे स्टॉफ सह दोन पंचासह लगेच निघुन दिनांक २०/०७/२०१६ रोजीचे २२.४५ वाजता बातमीच्या ठिकाणी पोहचुन बातमीची खात्री केली असता, इसम नामे १) अन्सार अलीम शेख, वय- २६ वर्ष, रा. चांदे कसारा, ता. कोपरगांव जि. अहमदनगर २) अमोल गमन लांगे वय- २१ वर्ष, रा. नगदवाडी, ता. कोपरगांव जि. अहमदनगर ३) अतिक अजिज शेख, वय- २२ वर्ष, रा. नगदवाडी, ता. कोपरगांव जि. औरंगाबाद ४) किरण त्रिंबक पवार, वय- २३ वर्ष, रा. देर्डे के-हाळे, ता. कोपरगांव जि. अहमदनगर ५) सचिन बाळु वाघ, वय- २५ वर्ष, रा. देर्डे के-हाळे, ता. कोपरगांव जि. अहमदनगर हे दरोड्यासाठी लागणारे घातक शस्त्रे चाकु व ईतर साहित्य व मोटर सायकलीसह असे एकूण ११७१५०/- रू. किंमतीच्या मालासह मिळून आले म्हणुन त्याचे विरूध्द पो.कॉ/४८९ संतोष काकडे यांनी सरकार तर्फे फिर्याद दिल्याने पो.स्टे. वाळुज गु.र.न. I १७९/२०१६ कलम- ३९९, ४०२ भादवि सह कलम ४,२५ भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर इसमाविरुध्द इतर जिल्ह्यात गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत.*

*सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) श्री. संदिप आटोळे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. खुशालचंद बाहेती पो.नि. श्री मधुकर सावंत यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उप निरीक्षक श्री. अनिल वाघ, पोलीस उप निरीक्षक श्री. जाधव, सफौ. शेख अरिफ, स.फौ. नसीमखान, पो.हे.कॉ./४५ विश्वास शिंदे, पो.ना./८२२ मनोज चव्हाण, पो.ना./४७० विकास शहाने, पो.ना./९४४ विजय गवळी, पो.कॉ./४८९ संतोष काकडे, पो.कॉ.२११४ संतोष सुर्यवंशी, पो.कॉ/४०४ संजय खोसरे पो.कॉ/रवि दांभाडे, पो.कॉ/विशाल सोनवणे, पो.कॉ/शिंदे सर्व नेमणुक गुन्हे शाखा औरंगाबाद शहर यांनी केली. सदर कामगिरीची दखल घेऊन मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेशकुमार यां- नी पो.नि.मधुकर सावंत, पोउपनि श्री. प्रशांत आवारे साहेब व त्यांचा टिमचा सत्कार करण्यात आला.*

# कुख्यात घरफोडया करणारा अजय ठाकुरला गुन्हे शाखे कडुन अटकेत.

----ooo----

*गुन्हे शाखेस गुप्त बातमीदाराकडुन २१/०७/२०१६ रोजी महिति मिळाली की, शहरात घरफोडीचे गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार अजय ठाकुर हा मोक्काच्या गुन्हयातील फरार आरोपी अनेक महिन्यांपासुन पोलीसांना चकमा देवुन फरार होता. तो जालना येथे असल्याची माहिती मिळाली. त्यामुळे गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अमित बागुल व प्रंशात आवारे, असे अधिकारी व कर्मचारी यांनी सापळा रचुन पकडण्यासाठी गेले होते. त्यामुळे साध्या वेशातील पोलीस उपनिरीक्षक बागुल यांना कुख्यात घरफोडया करणारा आरोपी अजय ठाकुर यांने ओळखले. त्यामुळे आरोपी अजय ठाकुर याने पोलीस उपनिरीक्षक बागुल व त्याच्या टीमला चकमा देवुन तो जालना येथुन निसटला. जाल्याकडुन औरंगाबादकडे येणा-या मार्गावर पोलिसांनी सापळा रचला होता आणि आरोपी अजय हा पलसर मोटार सायकलवर होता. पण फरार आरोपी अजय ठाकुर हा औरंगाबादकडे न येता तो अंबडमोर्गे गेला. त्यानंतर तो बीड बायपास रोडने गेल्याचे बातमी मिळताच पोलीस निरीक्षक मधुकर सांवत गुन्हे शाखा यांनी पोलीस उपनिरीक्षक अनिल वाघ आणि त्याच्या टीमला बीड बायपास रोडवर सापळा रचण्यास सांगितले.*

*त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक अनिल वाघ व त्याची टीम बिड बायपासवर फरार आरोपी अजय ठाकुरला पकडण्यासाठी बीड बायपासवर खाजगी वाहनात बसुन होते. अजय ठाकुर दिसताच क्षणी पोलीस उपनिरीक्षक अनिल वाघ हे त्यांच्या मोटार सायकल समोर आडवे झाले. त्यावेळी फरार आरोपी अजय ठाकुर याने सिनेस्टाईलने थेट पोलीस उपनिरीक्षक अनिल वाघ यांच्या अंगावर मोटारसायकल घातली. त्यावेळी पोलीस उपनिरीक्षक अनिल वाघ प्रंसगावधान दाखवुन त्यांनी बाजुला उडी घेतल्याने ते बालबाल बचावले. मात्र त्यांच्या हाता व पायाला गंभीर दुखापत झ् ाली. त्याच्यासोबतच्या कर्मचा-यांनी मोठया शिताफीने त्याच्या दुचाकीर झडप घातली व त्याला ताब्यात घेतले.*

*सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेश कुमार, मो.पोलीस उप आयुक्त मुख्यालय श्री.संदिप आटोळे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.खुशालचंद बाहेती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.मधुकर सावंत गुन्हे शाखा, पोउपनि श्री. प्रशांत आवारे, अनिल वाघ, अमित बागुल, पोहेकॉ. अशोक नरवडे, पोशि. सिध्दार्थ थोरात, योगेश गुप्ता, नंदलाल चाव्हाण, आनंद वाहुळ, शिवाजी भोसले, संतोष सुर्यवंशी, मनोज चव्हाण व धर्मराज गायकवाड सर्व नेमणुक गुन्हे शाखा यांनी केली आहे. सदर कामगिरीची दखल घेवुन मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेश कुमार यांनी पो.नि.मधुकर सावंत, व त्यांच्या टीमचा १,००,०००/- रुपये रोख रक्कम देवुन सत्कार करण्यात आला.*

# हर्सुल पोलीसांची धडक कारवाई,हैद्राबाद ची टोळी औरंगाबाद मध्ये जेरबंद.

----ooo----

*आरोपीने हैद्राबादमध्ये ६० लाखाची चोरी केली व तेथील हैद्राबाद पोलीस त्यांचा मागे लागले म्हणुन त्या आरोपींनी लपण्यासाठी औरंगाबाद हे शहर निवडले. औरंगाबाद मध्ये हर्सुल या परीसरात जहांगीर कॉलनी मध्ये एका नातेवाईकाकडे राहत होते. दिंनाक १३/०६/२०१६ रोजी रात्री हर्सुल पोलीस स्टेशनला गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, हर्सुल परीसराततील जहांगीर कॉलनी मध्ये काही संशईत व्यक्ती आहेत. या महितीच्या आधारावर हर्सुल पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारी पो.नि.वसीम हाश्मी यांच्या पथकाने रात्री १२.०० वाजाता पोलीस उपनिरीक्षक कैलास चाबुकस्वार ,रावसाहेब मुळे ,पोलीस कर्मचारी रतन बिघोत ,अशोक वाघ, पोपटराव पौळ प्रभाकर पांढरे, प्रकाश खरात, राधा काळुसे,नेहा वायभट यांनी सापळा रचुन तलाव परीसरात धडक कारवाई करुन त्या पाच आरोपीना अटक केली. त्यांनी कबुली जबाबाव्दारे माहिती दिली की, हैद्राबादमध्ये ६० लाखाची चोरी करुन आम्ही औरंगाबाद हे शहर लपण्यासाठी निवडले होते. अधिक विचारपुस केल्यावर कळाले की अटक करण्यात आलेली टोळी ही आंतरराज्यीय टोळी आहे.*

*अटक करण्यात आलेल्या टोळीमध्ये तीन पुरुष व दोन महिलाचा समावेश आहे. आरोपीचे नावे (१)दौलसिंग सोलांकी वय ५५ वर्ष, (२)मायादेवी सोलांकी वय ५० वर्ष दोघे रा.बेडवरा,मध्यप्रदेश (३)मिश्रीलाल चव्हाण वय ७० वर्ष रा.सुलतानाबाद,ता.गंगापुर (४)सिंधु काळे वय ६० वर्ष रा.जहॉगिर कॉलनी,हर्सुल (५)सिंधुलाबाई चव्हाण वय ६५ वर्ष रा.लासुर स्टेशन असे आरोपीचे नावे आहेत. त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना न्यायालयानी दोन दिवसाची पोलीस काठडी सुनवण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक कैलास पवार करत आहे.*

*सदर कामगिरीची दखल घेऊन मा.पोलीस आयुक्त श्री.अमितेशकुमार यांनी पो.नि.हाश्मी साहेब व त्यांचा टिमचा सत्कार करण्यात आला.*



---***---

# पोलीस आयुक्त,कार्यालय,औरंगाबादशहर.


## डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर,औरंगाबाद शहर-४३१००१(महाराष्ट्र राज्य)

Mail Id :- pi.cybercell.abad@mhapolice.gov.in दुरध्वनी क्रमांक:-०२४०-२९७०३४१ -------


------------------------------------------------------------------------------------

## परराज्यातील गुन्हेगारांना सोबत घेऊन औरंगाबाद शहरात गुन्हे करणाऱ्या टोळी कडुन आणखी गुन्हे उघड.

दिनांक १०/०२/२०१६ रोजी गुन्हे शाखेचे पो उप नि अनिल वाघ यांना मिळालेल्या गुप्त बातमी वरुन दरोड्याच्या तयारीत असलेल्या आरोपीना अटक करुन त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे क्रांतीचौक गुरनं १६१ /२०१६ कलम ३९९,४०२ भादवि सह कलम ४,२५ आर्म ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील आरोपी नामे १) मोहमद इजहार उर्फ लाला पिता मोहमद इरशाद वय ३५ वर्ष धंदा बेकरी रा. बडीगणी ता. नगीना जिल्हा बिजनोर, राज्य उत्तरप्रदेश २) दिलशाद अहमद पिता अब्दुल गणी वय- ३०, धंदा इलेक्ट्रीशन रा.मधुसुदनपुर हाफिज थाना कोतवाली ता.जि. बिजनोर, उत्तरप्रदेश ३) शेख हानिफ पिता शेख मोईनोद्दीन, वय-४२ धंदा रिक्क्षा ड्रायव्हर, रा. नेहरू भवन समोरची पहिली गल्ली, बुठ्ढीलाईन कवाडीपूरा औरंगाबाद. ४) शेख हारूण पिता शेख मोईनोद्दीन, वय- ३२ वर्ष, धंदा रिक्क्षा ड्रायव्हर, रा.गल्ली नं १० मिसारवाडी,औरंगाबाद. यांना उपरोक्त गुन्ह्यात पोलीस कस्टडीत असतांना विश्वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी शहरात विविध ठिकाणी तीन गुन्हे केल्याची कबुली दिली असून त्याचे कडून पो.स्टे.क्रातींचौक व पो.स्टे. एम. सिडको हद्दीतील गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींतां कडुन रिक्षा व रोख रक्कम सह सह एकूण १,८४,६००-००रुपयेंचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त अमितेश कुमार,पोलीस उपआयुक्त,(मुख्यालय) श्री.संदीप आटोळे, सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे शाखा ) श्री.खुशालचंद बाहेती यांच्या मार्गदर्शना खाली पो.नि अविनाश आघाव ,पो.उप.नि. अनिल वाघ, स.फौ आरेफ शेख पोहेकॉ/२१३ नितीन मोरे, पोहेकॉ/६५४ भिमराव आरके,पोना./८२२ मनोज चौहाण,पोकॉ/४०४संजय खोसरे, पो.कॉ/२११४ संतोष संर्यवंशी, पो.कॉ/२१८८ मुक्तेश्वर लाड सर्व नेम. गुन्हे शाखा औरंगाबाद शहर यांनी केली आहे.



१.शेख हारण शेख पोईणेद्दीन वय-३२वर्ष रा.गल्लीन-१० मिसारवाडी औरंगाबाद



२.शेख हातिक शेख मेरिणेद्र वय-४२वर्ष रा.बुढ्डीलाईन औरंगाबाद.



३.मो.इजहार उर्फ काला पिता मा.इरशाद वय२५ रा.बडीगणी उत्तर प्रदेश



४.दिलशाद अहमद अब्दुल गणी वय ३०, रा.कोतवाली उत्तर प्रदेश